नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 23/09/2021 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

## खून

पो.स्टे. उमरेड :– मौजा पेंढराबोडी तलावात कळमना शिवारात दि. 21/11/2020 चे 10.00 वा. पुर्वी एक अनोळखी पुरुष वय अंदाजे 30 ते 35 वर्षे चे प्रेत तलावाचे पाण्यात तरंगतांना मिळुन आले. फिर्यादी नामे– मंसाराम तुळशीराम मेश्राम, वय 56 वर्षे, रा. चिचघरे लेआउट, उमरेड जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे मर्ग क्र. 70/2020 कलम 174 जा.फौ. अन्वये मर्ग दाखल करुन तपासात घेतला. सदर मर्ग मधील मृतकाची ओळख पटवुन मृतक नामे– शुभम रमेश खंडार वय 28 वर्षे रा. बहीनाबाई नगर, उमरेड मर्ग चौकशीत निष्पन्न करण्यात आले. मर्ग चौकशी दरम्याण मृतकाचा मोठा भाऊ फिर्यादी याने आरोपी नामे– संजय भानारकर, रा. जोगीठाणापेठ, उमरेड याचे मृतकाचे घरी वारंवार येणे–जाणे होत असल्याने मृतकाचे आरोपी सोबत पटत नसल्याने तसेच मृतक याचे आरोपी सोबत होत असलेल्या झंगडा–भांडणाचे कारणावरुन आरोपीने मृतकाचा घातपात करुन खुन केला असल्याची तक्रार दिल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– लोकेश रमेश खंडार, वय 29 वर्षे, रा. बहीनाबाई नगर, उमरेड, जि. नागपुर, ह.मु. फ्लॅट नं. एच– 504 शिवराज नगर, पिंपरी चिंचवड पुणे मो.न. 8800464835 यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री यशवंत सोलसे मो.नं. 7038046399 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत खिंडसी तलाव येथे 20/09/2021 चे 08.00 वा. चे दरम्यान जठाशंकर उर्फ जेठया गणपत नागपुरे(मृतक) वय 40 वर्ष, रा. पंचाळा(बु), ता. रामटेक हा फिर्यादी नामे– नामे– विष्णु गणपत नागपुर, वय 28 वर्ष, रा. पंचाळा (बु) याचे सोबत खिंडसी तलावात मासेमारी करीता नावेने गेले होते. त्यादरम्यान अचानक विज पडल्याने ते बेशुद्ध होवुन पाण्यात बुडाल्याने दि. 22/09/2021 चे 08.00 वा. दरम्यान त्यांचा प्रेत पाण्यात वर आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार ओमप्रकाश कोडवते 9545844788 हे करीत आहे.

2) पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 8 किमी अंतरावरील मौजा केसोरी येथे 22/09/2021 चे 12.00 वा सुमारास वासुदेव जकीरा उईके(मृतक) वय 45 वर्ष, रा. केसोरी ता. कुही जि. नागपूर हे आपले घराचे काम करीत असतांना त्यांना लोखंडी सलाख कमी गेल्यामुळे त्यांनी बेबीबाई पदमाकर कुकडे यांना सलाखी करीता विचारणा करून त्यांच्या घरी सलाखी आणण्याकरीता गेले असता घराच्या मयालीवर असलेल्या सलाखी व त्याच मयालीला सिलींग फॅन सुद्धा लागलेले होते. सिलींग फॅन वायरने सलाखीला विद्यूत प्रवाह झाल्याने मृतक हा सलाखीला हात लावताच विद्युत करंट लागल्याने त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रमेश फकीरा उईके(मृतक) वय 40 वर्ष, रा. केसोरी ता. कुही जि. नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ यादवराव कुंभरे 9823370970 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर